**ाा हरिः ॐ ाा**

**पुस्तक परिचय**

**‘(अ) घोरकष्टोध्दरण स्तोत्रः अर्थ आणि विवेचन**

**परमपूज्य सद्‌गुरु श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी**

**ओम सद्‌गुरु प्रतिष्ठान, मुंबई**

**२००८**

दत्तसंप्रदायातील प्रत्येक भक्ताकरिता पूजनीय असणा-या परमहंस परिव्राजकार्य श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी, गुजराती आणि संस्कृत भाषेमध्ये विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. भारतभर भ्रमण करत असताना शिष्यांना होणा-या पारमार्थिक आणि सांसारिक क्लेशांचे निवारण करण्यासाठीच ही साहित्य रचना त्यांच्याकडून केली गेली. त्यांनी रचलेल्या संस्कृत भाषेमधल्या अनेक स्तोत्रांपैकी (अ)घोरकष्टोरद्धण स्तोत्र हे एक प्रसिद्ध स्तोत्र होय. आजही हे स्तोत्र दत्तभक्तांमध्ये अतिशय लोकप्रिय असून, अनेक स्थानांवर त्याचं पठण केलं जातं.

स्तोत्र पठण करताना आवश्यक असलेला भाव प्रकट झाला तरच ‘**भावग्राह्यÔ** अशा त्या परमतत्वापर्यत साधकाला पोहचता येतं आणि ज्ञानाशिवाय असा भाव प्रकट होवूच शकत नाही. थोरल्या स्वामी महाराजांनी रचलेल्या ग्रंथ संपदेवर अनेक वेळा विस्तृत लेखन केलं गेलं असलं तरी शब्दार्थापेक्षा कित्येक पटीने अधिक असलेला हा भावार्थ साधकापर्यंत पोहचणं आवश्यक असल्याचं प्रस्तुत पुस्तकाचे रचनाकार परमपूज्य सद्‌गुरु श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी यांच्या निदर्शनास आलं. सन १९९४ पासून सामुहिक यज्ञ साधनेचा संकल्प असलेले श्री. बापट गुरुजी सन २००४ पासून श्री. थोरल्या स्वामी महाराजांच्या बोरिवली तसेच खोपोली पादुका स्थानावर ओम् सद्‌गुरु प्रतिष्ठानचे सद्‌गुरु म्हणून विराजमान आहेत. प्रतिष्ठानचे संस्थापक सद्‌गुरु श्री. भाऊमहाराज करंदीकर यांचे जाहिर वक्तव्यानुसार श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतींचे स्वरुपच जणू श्री. बापट गुरुजींच्या रुपात प्रकट झाले आहे.

स्थानावर येणा-या साधकांनी श्रद्धायुक्त अंतःकरणाने आणि ज्ञानयुक्त भक्तीने स्तोत्राचे पठण करावे या उद्देशाने श्री. बापट गुरुजींनी (अ)घोरकष्टोरद्धण स्तोत्रावर सलग तीन दिवस सहा विवेचने केली होती.

सदर विवेचनांवर आधारीत असलेले हे पुस्तक दत्तजयंतीचे औचित्य साधून ओम् सद्‌गुरु प्रतिष्ठानने दिनांक १२ डिसेंबर २००८ रोजी सद्‌गुरुंच्याच शुभहस्ते प्रकाशित केले आहे.

सहा श्लोकांच्या या स्तोत्रांवर भाष्य करताना बापट गुरुजींनी प्रथमतः **'ा घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ा** या धृवपदाचा मथितार्थ सांगून त्यानंतर प्रत्येक श्लोकावर विस्तृत स्वरुपाचं निरुपण केलं आहे. मूळ स्तोत्रातल्या साहित्यिक मूल्यांची चर्चा करतानाच त्यातले गुह्य आध्यात्मिक अर्थ साधकांसमोर अत्यंत सोप्या, रसाळ भाषेत मांडण्याची श्री. बापट गुरुजींची हातोटी लक्षणीय आहे. तत्वज्ञानासारखा कठिण विषय हाताळत असताना मध्येच पेरलेल्या उद्‌बोधक आणि समर्पक गोष्टींमुळे सामान्य वाचकाला शेवटपर्यत खिळवून ठेवण्याचं सामर्थ्य पुस्तकात आहे. पुस्तकात अधुनमधून दिले गेलेले आधुनिक विज्ञानातले तसेच गणिती परिभाषेतले दाखले श्री. बापट गुरुजींची विज्ञाननिष्ठता दर्शवितानाच आजच्या सुशिक्षित साधकाला भक्तीमार्गाची गोडी लावण्याचं कार्य सुद्धा करतात. धकाधकीच्या जीवनात अनेकविध संघर्षाशी एकाकी लढा देणा-या आजच्या **आधुनिक** साधकांना, एकत्र येवून साधना करण्याचं महत्व सुद्धा अत्यंत कुशलपणे श्री. बापट गुरुजी पटवून देतात.

मूळ स्तोत्रात असलेली प्रचंड उर्जा ग्रहण करण्यासाठी आवश्यक असलेली शरणागतीची अवस्था प्राप्त होण्यासाठी, प्रत्येक अबालवृद्ध, उच्चशिक्षित किंवा अतिसामान्य दत्तभक्ताने हे पुस्तक वाचणे औचित्याचे ठरेल. या स्तोत्रात सामावलेली श्री. गुरुतत्वाची शक्ती, भक्ती आणि प्रेरणा कोणत्याही अवस्थेतल्या वाचकापर्यंत पोहचवण्याचं सामर्थ्य, श्री. वासुदेव बापट गुरुजी लिखित या पुस्तकात आहे हे निश्चित.

**-हरिः ॐ ा -**


पुस्तक मिळण्याचे ठिकाण : ओम् सद्‌गुरु प्रतिष्ठान<br>
अे/ ८, दौलत नगर, रस्ता क्र. ७,<br>
बोरिवली (पूर्व), मुंबई -४ ०० ०६६<br>
दुरभाष ----------------------

पुस्तक देणगीमूल्य : रुपये १२०/ प्रती प्रत<br>
एकूण पृष्ठ संख्या : १२०